"India's economic progress"

# भारताची आर्थिक प्रगती

सकाळ : १ मे १९७७

★ नवी दिल्ली : धान्य साठयाचा उच्चांक ! ! १७० लाख टन धान्य सरकारी गोदामातून ... असे शेतीकीमंत्री श्रीयुत ...

★ पाथर्डी : उपासमारीने कंटाळून येथील तान्हूबाईंनी आपल्या तीन लहान मुलांसह विहिरीत उडी टाकून जीव दिला.

★ मुंबई : अलिशान ओबेराय शेरिटन हॉटेलचे पर्यटनमंत्री यांचे हस्ते उद्‌घाटन.

• येथील एका मान्यवर संस्थेने केलेल्या पाहाणीत आढळून आले की मुंबईत सुमारे १५ लाख लोक झोपडपट्टीत राहात आहेत व त्यात रोज नवी भर पडत आहे.

• सुशिक्षित तरुणाने बेकारीला कंटाळून गळफास लावून घेतला.

उलटया सुलटया बातम्या डोळयासमोरुन सरकत होत्या आणि विचारांचा गुंता वाढत होता. धान्याची कोठारे तुडूंब भरली असताना उपासमार का ? १९४२ च्या दुष्काळात कलकत्त्यामध्ये श्रीमंताकडे तांदुळाच्या कणग्या भरल्या होत्या आणि अन्न नाही म्हणून लोक रस्त्यावर प्राण सोडीत होते. पण तेव्हा ब्रिटिशांचे राज्य होते. त्यांना काळया लोकांची किंमत काय असे आपण मानले. पण आता तर स्वकीय राज्य आहे ना. मग उपासमार का ? बेकारी का ? कितीतरी पाणीपुरवठा योजना, घरबांधणी योजना कागदावर तयार आहेत पण त्यांच्या कामाला सुरवात होत नाही. मग अलिशान हॉटेले, स्टेडियम, मंदिरे कशी बांधली जातात ?

वरवर पाहता उत्तर सोपे आहे. अर्थशास्त्राचा पहिला नियम : मागणी तसा पुरवठा ! कोठारे भरली असली धान्यानी तरी १। रुपया किलोने गहू विकत घ्यायला हातात पैसा हवा ना ! हजारो लोक फूटपाथवर राहतात कारण त्यांच्यासाठी घरे बांधणे किफातशीर होत नाही. पण अलिशान हॉटेल बांधून मोठा नफा मिळतो ना ! थोडक्यात, खासगी गुंतवणूक करताना त्यावर नफा किती मिळेल हे पाहिले जाते. लोकांच्या गरजेचा विचार होत नाही.

लोकांच्या प्राथमिक गरजांमध्ये फारसा फरक असण्याचे कारण नाही; मग 'मागणी'त एवढा फरक का ? पारूला वर्षाला एक लुगडे घेणे परवडत नाही पण नयना मात्र नित्य नवी झुळझुळीत साडी घेते. जाडया भरडया कापडाची गरज प्रचंड पण मागणी कमी आणि उंची, भरजरी, रेशमी, सिफॉन साडयांची मागणी मात्र जोरदार असे का ? कुटुंबाकुटुंबाच्या उत्पन्नात जी फार मोठी तफावत आहे तीच मागणीत दिसते. मूठभर श्रीमंत, त्याहून अधिक मध्यमवर्गीय आणि तळाला फार मोठया संख्येने कामकरी-कष्टकरी हा गरीब वर्ग आणि ह्या उतरंडीमध्ये श्रम आणि श्रीमंती यांचे व्यस्त प्रमाण असे चित्र आपल्याला समाजात दिसते. मग प्रश्न असा येतो की उत्पन्नाची वाटणी अशी विषम का होते ? मूठभर श्रीमंत आणि लाखो लोक गरीब असे का ?

## उत्पादन व वाटप

हे समजण्यासठी आपण थोडक्यात उत्पादन कसे होते ते पाहू. नैसर्गिक संपत्ती, यंत्रसामग्री आणि माणसांचे श्रम यांच्या सहाय्याने उत्पादन होते. यातील उत्पादनाची साधने ही श्रीमंताच्या हातात केंद्रित आहेत आणि ज्याना केवळ आपले श्रम विकून पोट भरावे लागते अशी कष्टकरी माणसे लाखांच्या संख्येने आहेत. ज्यांच्या मालकीची जमीन व कारखाने आहेत ते

म करणाऱ्यांची श्रमशक्ती किमान मोबदल्यात विकत तात. ज्यांच्याजवळ काम करण्याच्या कुवतीशिवाय ाही नाही ते आपले शारीरिक किंवा बौद्धिक श्रम रून मजुरी किंवा पगार फक्त मिळवतात. ज्यांच्याडे साधनसामग्री, यंत्रसामग्री याची मालकी आहे यांना संपत्तीपासूनचे मोठे उत्पन्न नफा-व्याज ह्या ावाखाली मिळते. संपत्तीच्या खाजगी मालकीहक्काळे संपत्तीकडे अधिक संपत्ती खेचली जाते. बडी ौद्योगिक घराणी आणखी मोठी होतात. उदा० १९६० ासून टाटा घरण्याची संपत्ती ३७५ कोटी रुपयांपासून ,७५ कोटी रुपयांपर्यंत वाढली तर बिर्ला घराण्याची २८३ कोटी रुपयांवरून १०६५ कोटी रुपयांपर्यंत ोहोचली. भारतातील औद्योगिक संपत्तीतील २५ टक्के ंपत्ती फक्त बारा बड्या घराण्यांच्या हातात आहे. ंपत्तीच्या अशा अत्यंत विषम वाटणीमुळे, उत्पन्न, शिक्षणाची संधी, सामाजिक स्थान यांमध्येही फार मोठी तफावत निर्माण होते.

आज भारतात दरडोई वार्षिक सरासरी उत्पन्न ११०० रुपयांच्या आसपास आहे. पण देशातील ७०% हून अधिक लोकांना ह्या सरासरीपेक्षा कमी उत्पन्न मिळते; कारण देशातील १०% श्रीमंत लोकांकडे जवळजवळ ४०% उत्पन्न जाते. किमान अन्न, वस्त्र व निवारा ह्या प्राथमिक गरजा पुऱ्या करावयाच्या तर १९६०–६१ मध्ये दरडोई वार्षिक २४० रुपयांची जरुर होती असे योजना आयोगाने नेमलेल्या तज्ञ समितीची शिफारस होती. त्यानंतर झालेली किंमतवाढ लक्षात घेता आज दरडोई वार्षिक ७२० रुपये उत्पन्नाची आवश्यकता आहे. भारतात जवळपास ५०% लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत, त्यांना आपल्या प्राथमिक गरजा आपल्या तोटक्या उत्पन्नात भागविता येत नाहीत. सुमारे २०% कुटुंबांना तर किमान आवश्यक उत्पन्नाच्या निम्म्याने उत्पन्न मिळते. म्हणजे त्यांच्यावर वर्षातून अनेकदा उपासमारीची वेळ येते.

## आर्थिक नियोजन

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३० वर्षांनी असे चित्र दिसते. तर मग नियोजनाने काय साधले असा प्रश्न पुढे येतो. कारण १९५१ साली भारतामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून नियोजनाचे पर्व सुरू झाले. नियोजनाची उद्दिष्टे व्यापक होती : (१) राष्ट्रीय उत्पादनात वाढ करणे. (२) आर्थिक व सामाजिक विषमता कमी करणे. (३) जनतेचे राहाणीमान उंचावणे. गेल्या २५ वर्षांतील आर्थिक वाटचालीचा आढावा घेतला तर नियोजनाची उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांमध्ये एवढी तफावत का ते लक्षात येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारलेली महत्त्वाची धोरणे पुढीलप्रमाणे —

(१) लोखंड, पोलाद, रसायने, अवजड यंत्रसामग्री यांसारखे मूलभूत उद्योग सरकारी व्यवस्थापनाखाली उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा उद्योगांसाठी प्रचंड भांडवलाची जरुरी असते व कारखान्याची उभारणी सुरू केल्यापासून ते प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यापूर्वी बराच काळ जातो. म्हणजेच नफा लगोलग सुटत नाही. त्यामुळे खाजगी उद्योगास ही क्षेत्रे आकर्षक नव्हती. परंतु भारतीय उद्योगांच्या वाढीसाठी हे उद्योग पायाभूत असल्याने आणि यंत्रसामग्री, रसायने यांसाठी परदेशावर अवलंबून राहावे लागू नये या हेतूने वरील उत्पादनाची जबाबदारी सरकारने स्वीकारली. विक्रीचे दरही देशातील औद्योगिक वाढीस उत्तेजन देण्याच्या दृष्टीने ठरविले गेले.

(२) उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी बंदरे, लोहमार्ग, रस्ते, वीज निर्मिती व पुरवठा, नागरी सुविधा अशा सोई आणि कुशल कामगार व तंत्रज्ञ यांचे शिक्षण याची जबाबदारी सरकारने घेतली.

(३) सरकारी वित्त संस्थांमार्फत खाजगी उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल पुरवठा करण्यात आला.

(४) भारतीय उद्योगांना परकीय मालाच्या स्पर्धेपासून संरक्षण देण्यासाठी आयातीवर निर्बंध घालण्यात आले, व सुरवातीच्या काळात 'संरक्षित' अशी बाजारपेठ भारतीय उद्योगांना मिळाली. त्या आधारे भारतीय उद्योगधंदे वाढीस लागले. उद्योगांची झटपट वाढ होण्यासाठी परकीय तज्ञ व भांडवल यांचे साहाय्य घेण्यास सुरवात झाली. निरनिराळ्या उद्योगांनी परकीय कंपन्यांशी सरसकट संगनमत करून प्रत्येकाची राखीव अशी बाजारपेठ निर्माण केली. त्यामुळे उत्पादनाची मक्तेदारी पद्धतीने वाढ झाली.

तील महत्त्वाच्या अनेक उद्योगातील उत्पादन दोन–चार कंपन्यांमध्ये केंद्रित असल्याचे . एकेक औषध किंवा व्हिटॅमिनच्या गोळ्या लॅक्सो, पार्कडेव्हिस अशा एखाददुसऱ्या बड्या न तयार केले जाते व बाजारपेठेवर त्यांचा राहातो. शिवाय 'पेटंट'चे हक्कामार्फतही रपेठ काबूत ठेवली जाते. उदाहरणार्थ, ॲस्प्रो, सीन अशी पेटंट्स. स्टेशनरीमध्ये कार्बनपेपर, सिल यासारख्या वस्तूंच्या उत्पादनावर बिर्लांच्या रूस' कंपनीचे वर्चस्व आहे. साबणाचे उत्पादन टा व हिंदुस्तान लिव्हर यांच्या वर्चस्वाखाली आहे. टारगाड्यांच्या उत्पादनात बिर्ला तर ट्रकच्या त्पादनात टाटा (टेल्को) घराण्याचे वर्चस्व आहे. उत्पादनातील मक्तेदारीमुळे वस्तूच्या किमती ठरविणे कंपनीच्या हाती राहाते. मोठ्या प्रमाणात नफा काढून त्यातील काही भाग लहान कंपन्यांना ताब्यात ठेवणे किंवा धंद्यात प्रवेश करू न देण्यासाठी वापरून मोठ्या कंपन्या आपले वर्चस्व टिकवून धरतात.

अशा मक्तेदारीमुळे ग्राहकांना वस्तू महाग पडतात. जाहिरातबाजीमध्ये पैशाची व साधनांची उधळपट्टी केली जाते. मोठ्या कंपन्यांच्या हातात नफा मोठ्या प्रमाणात एकत्रित झाल्यामुळे भांडवली गुंतवणुकीचे व उत्पादनाचे निर्णय त्यांच्या हातात राहतात.

## औद्योगिक चित्र

अशा रीतीने सरकारमार्फत आवश्यक त्या सोयी, कच्चा माल व यंत्रसामग्री, कर्जपुरवठा इत्यादी मदत खाजगी उद्योगास केली गेली. बाजारपेठ संरक्षित करून देण्यात आली. उत्पादनाचे निर्णय मात्र खाजगी उद्योगांच्या हातात होते. साहजिकच ज्या उद्योगात झटपट व मोठा नफा मिळेल अशा उद्योगांकडे खाजगी भांडवल ओढले जाऊ लागले.

शहरी व खेडेविभागातील सधन वर्गाची मागणी पुरवठ्यासाठी, मोटरगाड्या, स्कूटर, पंखे, रेफ्रिजरेटर, एयरकंडीशनर, टी. व्ही. सेटस्, सिफॉन, टेरिलीन कापड, प्रसाधने, थंड पेये व दारू, टॉनिक्स् अशा वस्तूंचे उत्पादन चक्रवाढीने वाढत गेले. ह्या उद्योगांना लागणारी यंत्रसामग्री बनविण्यासाठी व कच्चा माल बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतविले गेले. अशा रीतीने देशामध्ये कोणत्या वस्तूंचे उत्पादन वाढवावयाचे हे ठरविताना सामान्य जनतेच्या मूलभूत गरजांना अग्रक्रम मिळाला नाही. तर मुख्यतः सधन वर्गाच्या मागण्या लक्षात घेऊन उत्पादन वाढविले. तसेच ह्या वर्गात नवीन 'गरजा' निर्माण करण्यासाठी जाहिरातबाजी व आकर्षक विक्रीतंत्रे पुढे आली. चैनीच्या उपभोग्य वस्तूंचा प्रसार हेच प्रगतीचे लक्षण मानले जाऊ लागले.

शेती, जंगल, दूधदुभते, मासेमारी यांसारख्या प्राथमिक उद्योगातील उत्पादकता वाढविण्यासाठी मध्यम व लहान शेतकऱ्याला परवडतील अशी सुधारलेली अवजारे व यंत्रसामग्री तयार करण्याकडे मात्र लक्ष पुरविले गेले नाही. म्हणजेच उपलब्ध भांडवलाचा उपयोग देशातील उत्पादनाचा पाया रुंदावण्यासाठी न करता त्याची उधळमाधळ केली गेली.

भांडवलाचा दुसऱ्याही एका तऱ्हेने दुरुपयोग होताना आढळतो. निरनिराळे धातू, सिमेंट, तेल, साखर, धान्य इत्यादींचा पुरवठा अपुरा वाटला तर साठे वाढवून कृत्रिम टंचाई निर्माण करून साठेबाजी व सट्टेबाजी यांमध्ये पैसा गुंतवून भरपूर नफा मिळविणे शक्य झाल्याने त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल वळविले गेले. त्याचबरोबर नागरी मालमत्ता, अलिशान इमारती, हॉटेले, सिनेमाउद्योग यांसारखे सेवाउद्योग किफायतशीर झाल्याने त्यामध्ये भांडवल गुंतविले गेले. स्मगलिंग, सट्टेबाजी, कर चुकविल्यामुळे निर्माण झालेल्या काळ्या पैशाच्या जोरावर निरनिराळ्या चैनीच्या वस्तू, अलिशान इमले, शाही खाने व नाचरंग पुरविणारी हॉटेल यांची चलती होत राहिली. अशा रीतीने देशातील भांडवल सट्टेबाजी व चैनबाजी यासाठी बऱ्याच प्रमाणात वापरले गेले.

नवीन उद्योग उभारताना उत्पादनाचे तंत्र हे आपण अनेक वेळा परकीयांकडून घेतले. पाश्चिमात्य देशांत मजुरांची कमतरता असल्याने तेथील तंत्र भांडवलप्रधान बनलेले आहे. ते आपण उचलल्याने आधुनिक उद्योगात एका कामगाराला रोजगार पुरवायचा तर त्यासाठी फार मोठ्या रकमेने भांडवल गुंतवावे लागते. १९५१

इतर साधनसंपत्ती यांच्या अभावी अनेक- …मीन–पाणी आदीचा व्यवस्थित वापर करता … अशा रीतीनें जमिनीच्या विषम वाटणीमुळे …संपत्ती योग्य तऱ्हेने वापरली जात नाही. … शेतीमध्ये रोजगार फारसा वाढत नाही आणि बेकारीचे प्रमाण वाढत आहे.

सरकारमार्फत निरनिराळ्या, पतपुरवठा, कच्चा माल, खते पुरवठा यांच्या सोयी केल्या तरी वितरणाच्या यंत्रणेवर मोठे उद्योग किंवा जमीनदार यांचे वर्चस्व टिकून आहे. त्यामुळे कागदावर योजना लोककल्याण-कारी दिसली तरी तशी प्रत्यक्षात उतरत नाही. पतपुरवठा व व्यापार यांवर अजूनही खाजगी व्यापारांचे वर्चस्व आहे आणि खेडेपातळीपासून मुंबईपर्यंत व्यापारी व अडत्यांचे जाळे आहे. त्यामुळे किमतीवर त्यांचे नियंत्रण राहाते. कापूस एकाधिकार सारख्या योजनाद्वारे हे नियंत्रण मोडण्याचा प्रयत्न केला. परंतु नोकर-शाहीतील अनेक गैरव्यवहारामुळे शेवटी लहान शेतकरी नाडला जातो तो जातोच.

## आयात–निर्यात व करविषयक धोरण

देशातील आयात-निर्यात धोरणही मक्तेदारी भारतीय व परकीय उद्योग यांच्या सोयीने आखले गेलेले आढळते. परकीय संगनमतामुळे अनेक सुटे भाग, कच्चा माल इत्यादी वस्तू आयात करणे आपल्यावर लादले जाते. त्यासाठी निर्यात वाढविणे भाग पडते. मग तेलबीया, कांदे, मासे, चहा अशा सर्वांना आवश्यक अशा वस्तू का असेनात त्यांची निर्यात होते. परिणामी त्यांचे भाव भडकतात.

खाजगी उद्योगधंद्याच्या व सधन शेतीच्या वाढी-साठी सरकारनें मोठा भांडवली खर्च केला ते भांडवल कोठून गोळा केले ते पाहाणे महत्त्वाचे आहे. परकीय, देशांकडून कर्जरूपाने मोठ्या प्रमाणात मदत घेतली. त्यावरील व्याज फेडण्यातच निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा भाग खर्ची पडतो आहे. दुसरा मार्ग म्हणजे वाढते अबकारी करांचे दर. गेल्या पंचवीस वर्षांत करांच्या एकूण उत्पन्नामध्ये अबकारी कराच्या उत्पन्नाचे प्रमाण १० टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर गेले. यात सामान्य जनतेस आवश्यक अशा केरोसीन, काड्या-पेटी, डिझेल, साखर या वस्तूंवरील करांचा वाटा मोठा आहे. याउलट शेतीच्या उत्पन्नावर मात्र जवळपास कर नाहीच. सामान्य जनतेकडून मोठ्या प्रमाणात कर रूपाने गोळा केलेला पैसा खाजगी उद्योगाचा नफा वाढविण्यासाठी वापरला गेल्याने उत्पन्नातील विषमता वाढण्यास मदत झाली असे आढळते.

वरील सर्व धोरणांमुळे राष्टीय उत्पादनात सतत वाढ होण्याचा उद्देशही साधला जात नाही. १९६६ पासून भारतातील आर्थिक विकास अडखळत आहे. अनेक उद्योगांत यंत्रे कामाविना बंद पडून राहिलेली आढळतात. कारण उत्पादनक्षमता ज्या प्रमाणात वाढली, त्याबरोबर वस्तूंची मागणी वाढली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे वाढते राष्ट्रीय उत्पन्न अगदी छोट्या वर्गाच्या हातात केंद्रित आहे आणि त्यांच्या-कडून येणारी मागणी एका मर्यादेबाहेर मोठ्या प्रमा-णात वाढू शकत नाही. जनसामान्यांना अनेक गोष्टींची गरज आहे पण त्या वस्तू घेण्यासाठी त्यांच्याजवळ पैसा नाही. रोजगार फारसा वाढत नसल्याने सामान्य जन-तेची क्रयशक्ती वाढत नाही. औद्योगिक माल उठावा म्हणून आता निर्यातीचे प्रयत्न जोराने चालू आहेत. त्यासाठी अनुदाने दिली जात आहेत. पण परदेशातील उद्योगांची तीव्र स्पर्धा आणि युरोप – अमेरिकेतील मंदीचे वातावरण यामुळे निर्यातीच्या आधारे नफा टिकविणे व उद्योगधंदा वाढविणे कठीण आहे.

आर्थिक विकासाची गती मंद झाली. बेकारी वाढत चालली. अशा परिस्थितीत लोकांतील अस्वस्थता वाढत गेली आणि ' कायदा व सुव्यवस्था ' राखण्याचा खर्च वाढत गेला. म्हणजे उत्पादनाऐवजी शासनासाठीच अधिकाधिक खर्च होऊ लागला. त्यामुळे विकास खर्चा-वर मर्यादा येऊ लागली. अशा दुष्टचक्रात आपण सापडलो. गेल्या २५ वर्षांत सैन्य व पोलिसदल चक्रवाढीने वाढत चालले आहे. त्यामुळे उद्योगांचा तात्पुरता फायदा होतो. दारूगोळा, इतर सामग्री यांची बाजारपेठ मिळते. कामगार व इतर चळवळी काबूत ठेवल्या जाऊन उद्योग ' सुरळीतपणे ' चालतात. परंतु याचबरोबर राष्ट्रीय उत्पादनाचा मोठा वाटा शासन-सैन्य यंत्रणेत अडकून पडतो. व त्यामुळे आर्थिक वाढीवर मर्यादा पडते. वाढता खर्च भागविण्यासाठी तुटीची अंदाजपत्रके

पुढे येतात. ही तूट मोठ्या प्रमाणात चलनवाढ करून भागविली जाते. चलन फुगवट्याबरोबर किमती वाढू लागतात. त्यामुळे साठेबाजी व नफेबाजीचे फावते. कृत्रिम टंचाई निर्माण करून किमती अधिकच भडकविल्या जातात. परिणामी जनसामान्यांची अधिकच परवड होते.

## आर्थिक नियोजनाची फलनिष्पत्ती

★ गेल्या दहा वर्षात राष्ट्रीय उत्पन्न ३१ टक्के वाढले, औद्योगिक उत्पादन ३२ टक्के वाढले. बड्या उद्योगांची मालमत्ता १०० टक्के वाढली. त्यांचा नफा १५० टक्के वाढला.

★ रोजगार २० टक्के वाढला, बेकारी १०० टक्के वाढली. आज बेकारांची संख्या २१० लाख व अर्ध-बेकारांची संख्या २७० लाख आहे असा अंदाज आहे.

★ कामगारांचे वास्तविक उत्पन्न ५ % ने घसरले, शेतमजूर, लहान शेतकरी यांचे १५ % ने घसरले, बड्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीहून वाढले.

थोडक्यात संपत्तीचे केंद्रीकरण वाढले, उत्पन्नात विषमता वाढली, आर्थिक वाढीचा वेग अत्यंत मंदावला, त्यामुळे बेकारी मोठ्या प्रमाणात वाढत गेली. 'कायदा व सुव्यवस्थे'चे प्रश्न गंभीर झाले. त्याबरोबर 'शासना'वरील खर्च वाढत गेला. तुटीचे अर्थकारण चालू राहिले. किमती भडकत गेल्या.

आज वाढत्या किमती, वाढते दारिद्र्य, वाढती बेकारी हे गंभीर प्रश्न आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत पुढे आलेले निरनिराळे मार्ग निरुपयोगी ठरत आहेत. उत्पादनाचा पाया रुंदावत नाही, उद्योगातील आजची उत्पादन क्षमता बाजारपेठेच्या मर्यादेने पुरी वापरली जात नाही. त्यात सुधारणा करण्यासाठी सवलती, अनुदाने हे उपाय अपुरे पडत आहेत. म्हणजेच नवीन दिशेने विचार करण्याची वेळ आली आहे.

### १. भारतातील कामकऱ्यांची संख्या व बेकारांची संख्या

| साल | एकूण लोकसंख्या (आकडे लाखात) | कामकऱ्यांची संख्या (आकडे लाखात) | बेकारांची संख्या (आकडे लाखात) | एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजवर नोंदलेल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ३३६९ | १३९५ | ५३ (१९५६साल) | ३.२९ |
| १९६१ | ४३८९ | १८८७ | ९० | १८.३३ |
| १९७१ | ५४७९ | १८०४ | १८७ | ५१.८० |
| १९७५ | — | — | — | ९३.२६ |

### २. भारताचे राष्ट्रीय उत्पादन

| उत्पादनाचे क्षेत्र | दशलक्ष रुपये | १९६०–६१ | १९६५–६६ | १९७३–७४ |
|---|---|---|---|---|
| शेती व इतर प्राथमिक उत्पादन | ,, | ७० | १०२ | २६२ |
| औद्योगिक उत्पादन | ,, | २५ | ४२ | ९१ |
| व्यापार, सेवा इत्यादी | ,, | ३८ | ६४ | १४३ |
| एकूण राष्ट्रीय उत्पादन | ,, | १३३ | २०८ | ४९६ |
| १९६०–६१ च्या किमतीत एकूण राष्ट्रीय उत्पादन | ,, | १३३ | १५२ | १९९ |
| दरडोई राष्ट्रीय उत्पादन (रुपये) | | ३०६ | ३११ | ३४० |